श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे

# कृषि विज्ञान केंद्र, दहिगांव-ने (अहमदनगर - II)

ता.शेवगांव,जि.अहमदनगर (महा.) पिन ४१४ ५०२

Email : kvkdahigaon@gmail.com Website : www.kvkdahigaon.org

✻ आम्हास फॉलो करा : kvk.dahigaon kvkahmednagar2 DahigaonKvk

कालावधी : एप्रिल ते जून २०२५ अंक क्र.२०२५/२

# ई न्युज लेटर

## पथदर्शी प्रात्यक्षिक (FLD) -

### विषय : ऊस पिकात हुमणी किडीचे व्यवस्थापन

अहिल्यानगर जिल्ह्यातील बदलत्या वतावरणामुळे ऊस पिकात हुमणी किडीचा प्रादुर्भाव अलीकडील काही वर्षात मोठ्या प्रमाणत दिसून येत आहे हुमणी ही अतिशय नुकसानकारक बहुभक्षी कीड असून उन्नी, उकरी, गांढर,खतातील अळी, मे-जून भुंगेरे, व मुळे खाणारी अळी या नावाने सुद्धा ओळखले जाते.ऊस , सोयाबीन, कापूस, ऊस, अद्रक व हळद इत्यादीसारख्या विविध पिकांवर मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रामुख्याने ऊस पिकात उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात घट आढळून येते आहे ही कीड पिकांच्या मुळांवर उपजीविका करते. या किडीमुळे पिकाचे सरासरी ३० % ते ८० % आर्थिक नुकसान होते तर काही भागात १०० % पीक उध्ववस्त होते. ऊस पिकात उत्पादन व साखर उताऱ्यात घट होताना दिसून येत आहे. या किडीचा प्रादुर्भाव मे जून पासून सुरवात होते परंतु किडीच्या नुकसान मात्र सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये निदर्शनास येण्यास सुरवात होते. या बाबीचा विचार करून कृषि विज्ञान केंद्रामार्फत गेल्या काही वर्षापासून अभियान राबवले जात आहे त्याच बरोबर सन २०२२-२३ पासून ऊस पिकात या किडीच्या व्यवस्थापनासाठी नवीन उपलब्ध तंत्रज्ञानावर आधारित सूत्रकृमीचा वापर करणे या विषयी शेतकऱ्यांच्या शेतावर प्रात्यक्षिकाचे आयोजन केले आहे. त्यामध्ये दहिगाव ने परिसरातील १० शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे, त्यांना कृषि विज्ञान केंद्रामार्फत ईपीएन ( हुमणी किडीवर वाढणारे सूत्रकृमी) ४ किलो प्रती एकर प्रमाणे देण्यात आले आहेत.



## कृषि विस्तार अधिकारी / कर्मचारी प्रशिक्षण -

### विषय : फळपिकातील आधुनिक शिफारशी

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये फळ पिकांचे क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. डाळिंब, आंबा, केळी, संत्रा इ. पिकातून प्रती एकरी मिळणारा नफा इतर पिकांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा नविन लागवडीकडे कल दिवसेंदिवस वाढत आहे. फळ पिकांमध्ये समस्या देखील जास्त आहेत. त्यामुळे फलोत्पादक शेतकऱ्यांची क्षमता वृद्धी करणे गरजचे आहे. त्यासाठी कृषि विस्तार सेवकांना प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. या हेतूने दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी श्रीरामपूर येथे कृषि विस्तार सेवकांसाठी फळपिकातील आधुनिक शिफारशी या विषयावर कृषि विज्ञान केंद्र दहिगाव-ने व उपविभागीय कृषि अधिकारी,श्रीरामपूर यांचे संयुक्त विद्यमाने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये ७० कृषि विस्तार सेवकांनी सहभाग नोंदवला.



## शेतकरी प्रशिक्षण

### विषय : सोयाबीन एकात्मिक पिक उत्पादन तंत्रज्ञान

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान गळीतधान्य समुह आद्यरेषा पिक प्रात्यक्षिक अंतर्गत कृषि विज्ञान केंद दहिगाव ने येथे दिनांक ७ – ८ जून, १२ – १३ जून तसेच १७ – १८ जून २०२५ रोजी सोयाबीन एकात्मिक पिक उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर कृषि विज्ञान केंद्र , दहिगाव ने येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने अंतर्गत सोयाबीन पिकातील समूह आद्यरेषा प्रात्यक्षिकासाठी नेवासा तालुक्यातील १२५ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली असून सदर शेतकऱ्यांना सोयाबीन पिकातील आधुनिक तंत्रज्ञान ची ओळख होण्याच्या दृष्टीने सदर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना कृषि विज्ञान केंद्राच्या वतीने समूह आद्यरेषा पिक प्रात्यक्षिक कशा पद्धतीने राबवायचे या विषयी सर्व माहिती देण्यात आली. सोयाबीन पिकाचे एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करत असतांना माती व पाणी परीक्षण, माती पाणी परीक्षणानुसार सेंद्रिय , जैविक आणि रासायनिक खतांचा वापर कसा करावा, रासायनिक तसेच जैविक पद्धतीने बिजप्रक्रिया, पेरणीसाठी योग्य अंतर, रुंद सरी वरंबा यंत्राचा तसेच टोकन यंत्राचा वापर कसा करावा, एकात्मिक पद्धतीने तणांचे नियंत्रण कसे करावे, पाणी व्यवस्थापन तसेच एकात्मिक किड व रोगांचे व्यवस्थापन कसे करावे या विषयी सविस्तर अशी माहिती देण्यात आली. यावेळी प्रात्यक्षिकात सहभागी शेतकऱ्यांना कृषि निविष्ठा जसे सोयाबीन बियाणे, दाणेदार सल्फर, जीवामृत, प्रोफेनोफोस, द्रवरूप स्वरूपातील सुक्ष्म अन्नद्रव्य देण्यात आले. यावेळी प्रशिक्षणास बेल पिंपळगाव, घोगरगाव, पाचेगाव तालुका नेवासा तसेच चिचोंडी पाटील तालुका अहिल्यानगर येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### विषय : तूर लागवड तंत्रज्ञान

कृषि विज्ञान केंद दहिगाव ने अंतर्गत आंतरवाली तालुका नेवासा येथे दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी तूर लागवड तंत्रज्ञान या विषयावर प्रगतशील शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. तरवाली तालुका नेवासा येथील शेतकऱ्यांना तूर पिकातील आधुनिक तंत्रज्ञान ची ओळख होण्याच्या दृष्टीने सदर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना कृषि विज्ञान केंद्राच्या वतीने तूर पिकाचे एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करत असतांना माती व पाणी परीक्षण, माती पाणी परीक्षणानुसार सेंद्रिय , जैविक आणि रासायनिक खतांचा वापर कसा करावा, रासायनिक तसेच जैविक पद्धतीने बिजप्रक्रिया, पेरणीसाठी योग्य अंतर, रुंद सरी वरंबा यंत्राचा तसेच टोकन यंत्राचा वापर कसा करावा, एकात्मिक पद्धतीने तणांचे नियंत्रण कसे करावे, पाणी व्यवस्थापन तसेच एकात्मिक किड व रोगांचे व्यवस्थापन कसे करावे या विषयी सविस्तर अशी माहिती देण्यात आली.



### विषय : शाश्वत ऊस उत्पादन तंत्रज्ञान

ॲग्रोवन चे वर्धापन दिनानिमित्त ॲग्रोवन, कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव ने व राळेगण थेरपाळ सेवा सहकारी सोसायटी मार्फत राळेगण थेरपाळ ता. पारनेर येथे दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी शाश्वत ऊस उत्पादन तंत्रज्ञान या विषयी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री.नारायण बी. निबे विषय विशेषज्ञ (कृषि विद्या), कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव ने यांनी उपस्थित शेतकऱ्यांना ऊस पिकातील हुमणी व्यवस्थापन, माती परीक्षण आणि जैविक घटकांचा वापर या विषयी मार्गदर्शन केले. तसेच ऊस पिकाच्या विविध

वाणांची माहिती त्याचप्रमाणे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन या विषयी माहिती देण्यात आली. या कार्यक्रमास सरपंच , संचालक तसेच मोठ्या प्रमाणावर प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.



**विषय : भूजल पुनर्भरण**

कृषि विज्ञान केंद्र दहिगाव–ने च्या वतीने गाव–वडुले ता. नेवासा येथे दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी भूजल पुनर्भरण महत्व व त्याच्या विविध शास्त्रीय पद्धती या विषयावर शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. दिवसेंदिवस जमिनीच्या पोटातील पाण्याच्या पातळीत होणारी घसरण आणि पाण्याचे दुर्भिक्ष कमी करायचे असल्यास शेतकऱ्यांनी वैयक्तिक स्तरावर भूजल पुनर्भरण तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केव्हीके च्या वतीने यावेळी करण्यात आले.



**विषय : शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना व त्याची फायदे.**

कृषी विज्ञान केंद्र दहिगाव ने वतीने मोहोज देवढे, तालुका पाथर्डी या गावांमध्ये शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना व त्याची फायदे या विषयावर दिनांक २१ मे २०२५ रोजी एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना, संचालक व प्रवर्तक निवड, आवश्यक कागदपत्रे, नोंदणींची कार्यपध्दती याबद्दल सविस्तर मार्गदर्शन उपस्थित शेतकऱ्यांना करण्यात आले. स्थापनेपासून होणारे फायदे त्यामधील कायदेशीर बाबी व कंपनी स्थापने अगोदर घ्यावयाची काळजी याबद्दल देखिल मार्गदर्शन करण्यात आले.



**विषय : एकात्मिक शेती पद्धती बद्दल जनजागृती**

कृषि विज्ञान केंद्राचे माध्यमातून मौजे पागोरी पिंपळगाव ता. पाथर्डी येथे एकात्मिक शेती पद्धती याबद्दलचे प्रशिक्षण दिनांक २७ जुन२०२५ रोजी संपन्न झाले. यावेळी गाव व परीसरामध्ये उपलब्ध संसाधने, एकात्मिक शेतीची विविध मॉडेल्स, कृषि विद्यापीठांमध्ये झालेले संशोधन, विविध यशोगाथा, यशस्वी शेती पूरक व्यवसाय याबद्दल चर्चा करण्यात आली. या प्रशिक्षण वर्गात गावातील सहायक कृषि अधिकारी व एकूण २९ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.



**विषय : जनावारांचे खुरे साळणी तंत्रज्ञान**

नेवासा,शेवगाव तालुक्यातील बर्याच प्रमाणात शेतकरी शेतीला जोड धंदा म्हणून दुग्धव्यवसाय करतात, दूध उत्पादकाकडून मुक्त संचार गोठा तसेच बंदिस्त गोठा या दोन पद्धतीच्या गोठ्याचा अवलंब केला जातो. अशा बर्याच गोठ्यामद्धे जनावरे लंगडण्याचे प्रमाण आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे दर सहा महीने किवा वार्षिक खुरे

साळणी न करणे. त्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, दहीगाँव ने यांच्या मार्फत जनावारांचे खुरे साळणी तंत्रज्ञान विषयावर शेतकरी प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात आधुनिक खुरे साळणी तंत्रज्ञान त्यासाठी लागणारे साहित्य यावर चर्चा झाली. हे प्रशिक्षण १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिना निम्मीत आयोजित केले गेले होते . या प्रशिक्षणात ४६ शेतकर्यांनी सहभाग नौंदवला.



**विस्तार उपक्रम**

**किसान गोष्टी**

**विषय : सोयाबीन पिक उत्पादन तंत्रज्ञान**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान गळीतधान्य समुह आद्यरेषा पिक प्रात्यक्षिक अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव ने मार्फत वडुले ता. नेवासा येथे सोयाबीन पिक उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर किसान गोष्टी चे आयोजन दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी करण्यात आले. सोयाबीन पिक एकात्मिक पिक उत्पादन तंत्रज्ञान या विषयी किसान गोष्टी हा कार्यक्रम पार पडला. विषय विशेषज्ञ (कृषि विद्या), कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव ने यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सोयाबीन एकात्मिक पिक उत्पादन, खरीप हंगामाची पूर्व तयारी , माती परीक्षण आणि जैविक घटकांचा वापर या विषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. इंजि. राहुल पाटील यांनी सोयाबीन पिकामध्ये यंत्रे आणि औजारांचा वापर आणि बिज प्रक्रिया करण्यासाठी बिज प्रक्रिया ड्रम चा वापर करून कमी श्रमात बिज प्रक्रिया कशी करावी या विषयी माहिती दिली. या कार्यक्रमास वडुले येथील प्रगतशील शेतकरी तसेच महाराष्ट्र शासन कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार श्री. किशोर नरुटे यांनी मानले.



**कार्यशाळा**

**खरीप हंगाम २०२५ नियोजन :**

तालुका कृषि अधिकारी, पाथर्डी व विज्ञान केंद्र दहिगाव–ने च्या वतीने ता. पाथर्डी येथे दिनांक ५ मे रोजी खरीप हंगाम पूर्व शेतकरी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी उपविभागीय कृषि अधिकारी अहिल्यानगर श्री. डमाळे, तालुका कृषि अधिकारी श्री. लोंढे व केव्हीके चे इंजि. राहुल एस. पाटील उपस्थित होते. कृषि विज्ञान केंद्राच्या वतीने खरीप हंगामातील पिकांसाठी यांत्रिकीकरण जसे, रुंद वरंबा सरी तंत्रज्ञान, टोकन यंत्रे, ड्रोन द्वारे फवारणी, पेरणीसाठी वापरली ट्रॅक्टर चलित विविध पेरणी यंत्रे इ. विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



**विकसित कृषि संकल्प अभियान :**

केंद्रीय कृषि विकास व शेतकरी कल्याण मंत्री मा.श्री. शिवराजसिंह चौहान यांच्या संकल्पनेतून कृषि व किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली च्या वतीने दिनांक २९ मे ते १२ जून दरम्यान 'विकसित कृषि संकल्प अभियान' राबविण्यात आले. या अभियानाचा उद्देश शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना खरीप हंगाम पिकाविषयी व नवीन

तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन करणे, शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेणे, शेतकऱ्यांनी विकसित केलेले नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान माहिती करून घेणे, शेतीविषयक योजनांची माहिती शेतकऱ्यांना देणे इ. कार्यक्रमांवर भर देण्यात आला. यावेळी केव्हीके दहिगाव–ने द्वारा शेती तंत्रज्ञान रथ देखील गावागावांतून फिरवण्यात आला. या अभियानात कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव–ने च्या नेतृत्वामध्ये केव्हीके, राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्था बारामती, आत्मा व कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांनी सहभाग नोंदवला. केव्हीके दहिगाव ने च्या वतीने शास्त्रज्ञांच्या २ टीम ने कार्यक्षेत्रातील खालील सात तालुक्यातील निवडक ९० गावात जाऊन या अभियानाचा उद्देश सफल केला. केव्हीके चे डॉ. एस.एस.कौशिक, श्री. माणिक लाखे, श्री. नारायण निबे, श्री सचिन बडधे, श्री. नंदकिशोर दहातोंडे, इंजी.राहुल एस. पाटील, डॉ. चंद्रशेखर गवळी, श्री. प्रकाश हिंगे, श्री. प्रकाश बहिरट तसेच नियासम (NIASM) बारामती चे शास्त्रज्ञ डॉ. धनंजय नांगरे, डॉ. बैराह, डॉ. सुशील चांगण, डॉ. बसवराज पाटील तसेच ज्या त्या तालूक्यातील कृषि विभाग व 'आत्मा' चे अधिकारी सामील होते.









**केव्हीके शेती कट्टा :**

कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून सामुहिक प्रयत्न करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने कोळगाव ता. शेवगाव या गावाची निवड केलेली आहे. या गावांमध्ये दिनांक २८ एप्रिल २०२५, दिनांक १५ मे २०२५ व दिनांक २५ जुन२०२५ रोजी केव्हीके शेती कट्टा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना गहू व कांदा पिकाची साठवणूक, उन्हाळ्यात करावयाची कामे, खरीप हंगामाचे नियोजन, खरीप हंगामातील प्रमुख पिके जसे कपाशी, तुर, उडीद, सोयबीन यांचे नियोजन, केव्हीके कडे खरीप हंगाम अनुषंगाने उपलब्ध निविष्टा याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ व विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या), विषय विशेषज्ञ (कृषि विद्या), विषय विशेषज्ञ (कृषि अभियांत्रिकी), विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार), प्रक्षेत्र व्यवस्थापक, कार्यक्रम सहायक (मृदा चाचणी) यांनी सहभा ग घेऊन मार्गदर्शन केले. यामध्ये एकूण ९८ शेतकरी सहभागी झाले.



## शेतकरी अभ्यास दौरा

कृषि विज्ञान केंद्र दहिगाव–ने व लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सह.सा.का.लि., भेंडे यांचे संयुक्त विद्यमाने संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्रजी घुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २४/०४/२०२५ रोजी कृषि विज्ञान केंद्र बारामती येथे कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI) आधारित ऊस शेती चा अभ्यास करण्यासाठी एकदिवसीय कृषि विस्तारक व शेतकरी यांचा अभ्यास दौरा संपन्न झाला. या दौऱ्यामध्ये केव्हीके बारामती प्रक्षेत्रावरील या तंत्रज्ञान आधारित विविध हंगामामध्ये लागवड केलेल्या व खोडवा पिकाची पाहणी करण्यात आली. तसेच तेथील वॉररूम व नियंत्रण कशास भेट देवून चर्चा करण्यात आली. उसामध्ये AI तंत्रज्ञानाचे फायदे, त्याचा वापर व येणारा खर्च या बाबत सादरीकरण करण्यात आले. केव्हीके बारामतीचे श्री. संतोष गोडसे, श्री. महेश जाधव व श्री. तुषार जाधव यांनी यावेळी वरीलप्रमाणे सर्व माहिती दिली. या अभ्यास दौऱ्यात संस्थेचे विश्वस्त, ॲग्री ओव्हरसियर, प्रगतशील ऊस उत्पादक शेतकरी, केव्हीके चे वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख व केव्हीके संबंधित स्टाफ असे एकुण ९० जणांनी सहभाग नोंदवला.





## माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा अहवाल.

श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे कृषी विज्ञान केंद्र, दहिगाव ने मार्फत खरीप हंगामात राट्रीय अन्नसुरक्षा योजनेतून सोयाबीन ,तूर आणि उडीद पिकांची पथदर्शी प्रात्यक्षिक घेण्यात आली होती .त्यांची माती तपासणी करतात प्रयोगशाळे मध्ये एकूण ६९५ माती नमुने प्राप्त झाली होती . माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळेत मातीचे रासायनिक विश्लेषण करण्यात आले, ज्यामुळे जमिनीची सुपीकता कळाली. पिकांसाठी योग्य खतांचे नियोजन करता आले आणि रासायनिक खतांचा अनावश्यक वापर टाळण्यासाठी प्रयत्नकरता आला .

### मृदा चाचणीचे फायदे

- जमिनीचे आरोग्य: जमिनीतील पोषक तत्वांचे संतुलन राखण्यास मदत होते.
- योग्य खत व्यवस्थापन: पिकांना कोणती खते किती प्रमाणात द्यावीत, हे समजते.
- खर्चात बचत: अनावश्यक खते टाळल्याने पैशांची बचत होते.
- उत्पादन वाढ: मातीची सुपीकता सुधारून पिकांचे उत्पादन वाढवता येते.
- पीक नियोजनास मदत: जमिनीच्या गुणधर्मांनुसार योग्य पिकाची निवड करता येते.
- अहवाल व शिफारशी : चाचणीनंतर माती आरोग्य पत्रिका दिली जाते, ज्यात मातीतील कमतरता आणि खतांच्या वापराबाबत शिफारशी असतात.


**कृषि विज्ञान केंद्र, दहिगांव–ने (अहमदनगर II)**

डॉ.एस.एस.कौशिक (प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ) कृ.वि.कें.दहिगाव-ने,ता.शेवगांव
यांनी दहिगाव–ने येथे प्रसिध्द केले आहे.

Email : kvkdahigaon@gmail.com, Website : www.kvkdahigaon.org

मुख्य संपादक : डॉ.एस.एस.कौशिक (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख)
सह संपादक : श्री.सचिन बडधे (विषय विशेषज्ञ,कृषि विस्तार)



-: संपादक मंडळ :-

श्री.माणिक लाखे (विषय विशेषज्ञ,पीक संरक्षक)
श्री.नारायण निबे (विषय विशेषज्ञ,कृषि विद्या)
श्री.नंदकिशोर दहातोंडे (विषय विशेषज्ञ,उद्यानविद्या)
इंजि.राहुल पाटील (विषय विशेषज्ञ,कृषि अभियांत्रिकी)
डॉ.चंद्रशेखर गवळी (विषय विशेषज्ञ,पशुविज्ञान)
श्री.प्रकाश बहिरट (प्रयोगशाळा तंत्रज्ञ,मृद परिक्षण)
श्री.प्रकाश हिंगे (प्रक्षेत्र व्यवस्थापन)
श्री.वैभव नगरकर (कार्यक्रम सहाय्यक,संगणक)